# प्रेसनोट

जा.क्र.स्थागुअशा/प्रेसनोट/ 1320 /2020
पोलीस अधीक्षक कार्यालय, सिंधुदुर्ग.
दुरध्वनी क्रमांक - 02362-228209
Email - cyber.sindhudurg@mahapolice.gov.in
दि. 13 / 05 /2020.

---

कोरोना विषाणु संक्रमणाच्या पार्श्वभुमीवर 23 मार्च 2020 पासून संपूर्ण देशामध्ये Lockdown घोषित करण्यात आला. मानव जातीवर अचानक उद्‌भवलेल्या या संकटाचा सामना करण्यासाठी व नागरीकांना सुरक्षित ठेवण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दल सदैव कार्यतत्पर राहिले आहे.

दैनंदिन कर्तव्य बजावत असताना नकळतपणे कर्तव्यावरील पोलीस कोणत्याही प्रकारे कोरोना विषाणुच्या संपर्कात येण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे पोलीस व त्यांचे कुटुबिय यांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी व रोगप्रतिकारकशक्ती वाढविण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच त्यांचे कुटुंबातील सदस्य यांचेकरीता Arsenicum Album -30 या Homeopathic औषधाच्या एकुण 1300 बॉटल्सचे वितरण करण्यात आलेले आहे. प्रत्येक व्यक्तीने प्रतिदिन प्रत्येकी 4 याप्रमाणे सलग 3 दिवस उपाशी पोटी या औषधाचे सेवन करावयाचे असून या औषधाचा दुसरा डोस हा 1 महिन्याच्या कालावधीनंतर घ्यावयाचा असल्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना सुचित करण्यात आलेले आहे. तसेच Multivitemin Tablets with Minerals and Trace Elements (Supradyn) याच्या प्रत्येकी 15 Tablets strip प्रमाणे एकुण 1200 Strips चे वितरण करण्यात आले असुन प्रतिदिन एक याप्रमाणे गोळयांचे सेवन करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

जिल्हयातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी सदर औषधाचे सेवन केले आहे अगर कसे याचा दैनंदिन आढावा पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून घेण्यात येत आहे. पोलीसांच्या सुरक्षिततेबाबतची सदरची उपाययोजना श्री. दिक्षीत गेडाम, पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली आहे. पोलीसांचे आरोग्य सुरक्षित ठेवणेकरीताच्या महत्त्वाच्या निर्णयाची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात येत आहे.

( सुनिल धनावडे )
पोलीस निरीक्षक,
स्थागुअशा व जनसंपर्क अधिकारी, सिंधुदुर्ग.

प्रत- जिल्हा माहिती अधिकारी,सिंधुदुर्ग